# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक २९ /१२/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०८ सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | वसई विरार शहर महानगरपालिकेला ३ तारांकित मानांकन (Star Rating) स्वयंघोषीत तसेच शहर हागंदारीमुक्त (ODF + ) स्वयंघोषीत करण्याबाबत. | प्रस्तावाचा ठराव/निर्णय :- सदर बाबत सभागृहात सविस्तर चर्चा करणेत आली. या कामी वसई विरार शहर महानगरपालिकेला "३" तारांकीत मानांकन ठरविण्यासाठी व ODF+ तसेच एकुणच स्वच्छ भारत अभियाना अतंर्गत आजपर्यंत वसई विरार शहर महानगरपालिकेने केलेली प्रत्यक्ष कार्यवाही व कामगिरी पाहता हगणदारीमुक्त शहराचे ODF++ certification साठी मा. सर्वसाधारण सभेमार्फत वसई विरार शहर महानगरपालिकेला "३" इतके तारांकीत मानांकन मंजुर करुन राज्य शासनास अंतिम मंजुरीसाठी पाठविणेस ही सभा प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक :- (सुदेश प्रभाकर चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | विरार,नालासोपारा आणि वसई रोड दरम्यान रेल्वे ट्रॅकवर ३ ठिकाणी क्रॉस कल्वर्ट बांधणेबाबत. | प्रस्तावाचा निर्णय :- वरील विषयाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली वरील तिन्ही ठिकाणी करावयाच्या बांधकामासाठी रक्कम रुपये २२,१८,८५,४५९.००/- व नियोजन व अंमलबजावणी चार्जेस रु. ४१,९७,९७७.००/- रेल्वे प्राधिकरणाकडे जमा करणेस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस मान्यता देत आहे. सदरचे काम रेल्वे प्राधिकरणामार्फत करुन घेणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच वसई स्टेशन (उत्तरेस) धुरी कॉम्प्लेक्स ते रेल्वे पोल क्र. ५२/१२/१३ या ठिकाणी १८००मी मी व्यासाचे (२ Nos) आर.सी.सी. पाईप कल्वर्ट बांधण्यास ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रेल्वे प्राधिकरण कडून प्राप्त करुन घ्यावे. सदर होणारा अतिरिक्त खर्च व त्याचे नियोजन/अमंलबजावणी खर्च रेल्वेस वर्ग करणेस ही सभा मंजूरी देत आहे. सदर कामही रेल्वेकडून करुन घेण्यात यावे असे ही सभा ठरविते.<br>अनुमोदक :- (सुदेश प्रभाकर चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

नगरसचिव

वसई विरार शहर महानगरपालिका